देशदूत
www.deshdoot.com
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५

# काश्मिरात नरसंहार

## शोक... श्रद्धांजली...!



◉ पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींचे मृतदेह बंगळुरू विमानतळावर आल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करताना भाजप खासदार तेजस्वी सूर्या.



◉ मधुसूदन राव यांचे पार्थिव चेन्नई विमानतळावर पोहोचल्यानंतर शोकमग्न झालेले राव कुटुंबीय



◉ सुरतमधील शैलेश कलाथिया यांच्या अंत्ययात्रेत सहभागी जनसमुदाय.



◉ पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृत भारत भूषण यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या बंगळुरू येथे पोहोचले. यावेळी त्यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

# ते म्हणाले, हिंदू कोण, मुस्लीम कोण? अन् तिघांना गोळ्या घातल्या

## डोंबिवलीच्या लेले, मोने कुटुंबियांनी सांगितला थरारक अनुभव

▸▸ डोंबिवली । वृत्तसंस्था

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात डोंबिवलीचे रहिवासी अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी या तीन मावस भावांचा मृत्यू झाला. यानंतर संजय लेलेंचा मुलगा हर्षल याने या हल्ल्याचा थरार सांगितला. जोशी, लेले आणि मोने कुटुंबाने एकत्र पत्रकार परिषद घेत त्यात त्यांनी हल्ल्याच्या वेळी घडलेला थरारक अनुभव सांगितला.

अतुल मोने यांच्या पत्नी अनुष्का मोने यांनी सांगितले की, आम्ही दुपारी १.३० च्या सुमारास तिथे पोहोचलो. तिथे पर्यटकांची खूप गर्दी होती. आम्ही सर्व आनंदी होतो. ऊन खूप असल्यामुळे आम्ही पाणी पिण्यासाठी आणि थोडे काही खाण्यासाठी एका स्टॉलवर गेलो. आमचे तिथे खाऊन झाल्यावर आम्हाला शूटिंगचा आवाज आला. आम्हाला सुरुवातीला वाटले की, पर्यटनस्थळ असल्यामुळे या ठिकाणी गेम्स असतील, असे समजून आम्ही लक्ष दिले नाही. पण नंतर अचानक फायरिंग चालू झाली आणि सगळीकडे गोंधळ उडाला. तिथे उपस्थित सगळेच लोक घाबरले. आम्ही सगळे खाली झोपलो.

### घरातील कर्त्या पुरुषाला मारले

अनुष्का मोने म्हणाल्या की, दहशतवादी आमच्याजवळ आल्यावर माझे पती त्यांना म्हणाले की, आम्हाला गोळ्या मारू नका. पण दहशतवाद्यांनी आम्हाला विचारले तुमच्यापैकी हिंदू कोण आणि मुस्लीम कोण? जीजूंनी हात वर केला, तर त्यांना गोळ्या घातल्या. आमच्यासमोर आमच्या तिघांना गोळ्या घालण्यात आल्या. हे आमच्या घरातले कर्ते पुरुष होते आणि आम्ही त्यांना वाचवण्यासाठी काहीही करू शकलो नाही. अशा बऱ्याच जणांना त्यांनी मारले आहे. दहशतवादी गेल्यानंतर आम्ही त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला. पण आम्हाला काही करता आले नाही. अनेकांनी आम्हाला तुम्ही तुमचा जीव वाचवून जा असे सांगितले. तुम्ही लोकांनी येथे दहशत निर्माण करून ठेवली आहे असे म्हणत दहशतवादी फायरिंग करत होते. पर्यटक फक्त फिरायला येतात. त्यांचा काय गुन्हा आहे? सरकारने यावर कारवाई करत आम्हाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### बाबांचे डोके रक्ताने माखलेले होते



संजय लेले यांचा मुलगा हर्षल लेले याने पहलगाममध्ये नक्की काय घडले याची हादरवणारी कहाणी सांगितली. तो म्हणाला की, आम्ही तिथे आदल्या दिवशी आलो होतो. तिकडून ज्यावेळी गोळ्या चालल्या त्यावेळी माझा हात माझ्या वडिलांच्या डोक्यावर होता. माझ्या हाताला तेव्हा काहीतरी जाणवले, मला असे वाटले की माझ्या हाताला गोळी लागलीय. नंतर मी जेव्हा उठून पाहिले तेव्हा मी माझ्या बाबांचे डोके बघितले, ते पूर्ण रक्ताने माखलेले होते. मी जेव्हा सर्व बघितले तेव्हा तिथल्या स्थानिकांनी सांगितले की, यांना जर मदत पोहोचवायची असेल तर आर्मीवाले येतील. आधी तुम्ही तुमचा जीव वाचवा आणि इथून निघून जा आणि तो स्पॉट असा होता की, तिथे वर जायला तीन तास लागतात, ते पण घोड्याने. 'मग तिथे सर्व घोडेवाले आले त्यांनी एकेकाला घोड्यांनी खाली पाठवायला सुरुवात केली, उरलेले बाकी चालत खाली उतरत होते. त्यामुळे आम्हाला खाली उतरायला चार तास लागले. माझ्या आईला पॅरालिसीस आहे, त्यामुळे माझ्या भावाने आणि मी तिला उचलून काहीवेळ चालत खाली आणले. मग ती स्वत: चालत आली. त्यानंतर जो आमचा घोडा होता, ज्याने आम्हाला वर आणले, तो नशिबाने तिथे पोहोचला. मग आम्ही आईला घोड्यावर बसवून खाली पाठवले. मी आणि माझा भाऊ चार तास चालत आलो.' दरम्यान, हल्ल्याचा थरार सांगताना हर्षलला अश्रू अनावर झाले.

# जगदाळे, गणबोटे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार



▸▸ पुणे । प्रतिनिधी

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पुण्यातील संतोष जगदाळे व कौस्तुभ गणबोटे यांच्या पार्थिवावर काल सकाळी साडेदहाच्या सुमारास वैकुंठ स्मशानभूमीत विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी हजारो पुणेकरांनी साश्रू नयनांनी या दोघांना अखेरचा निरोप दिला. एकीकडे दुःख तर पाकिस्तानविरोधात संतापाची लाट असे चित्र वैकुंठ स्मशानभूमीत होते.

आपल्या वडिलांच्या रक्ताने माखलेले कपडे घालूनच जगदाळे यांची मुलगी आसावरी हिने वडिलांचा अंत्यविधी केला. रक्ताने माखलेले कपडे घालून आसावरी आली असल्याचे उपस्थितांना कळाले तेव्हा पहलगाम येथील दहशतवादी हल्ला किती भयावह असेल या विचाराने अनेकांनी हळहळ व्यक्त केली. त्याचवेळी पाकिस्तान विरोधात संताप व्यक्त करत पाकिस्तानविरोधात घोषणबाजी करत वंदे मातरम्, भारत माता की जयचा नारा दिला.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा जणांना आपले प्राण गमवावे लागले. यात पुण्यातील संतोष जगदाळे (५४, रा. ज्ञानदीप कॉलनी, कर्वेनगर) व कौस्तुभ गणबोटे (५६, रा. शांतीनगर साळुंखे गार्डन, गंगाधाम, पुणे) हे मृत्युमुखी पडले.संतोष व कौस्तुभ यांचे पार्थिव विशेष विमानाने गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास पुण्यात आणण्यात आले. यावेळी लोहगाव विमानतळ येथे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे, कॅबिनेट मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार बापूसाहेब पठारे आणि जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी तसेच अन्य प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. मुरलीधर मोहोळ यांनी अश्रूंनी श्रद्धांजली वाहिली. तेव्हा विमानतळावर मोठी शोककळा पसरली. लष्कर आणि पोलीस अधिकाऱ्यांनीही त्यांच्या सन्मानार्थ सलामी दिली. तद्नंतर या दोघांचे पार्थिव रुग्णवाहिकेतून त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी नेण्यात आले.

सकाळी नऊच्या सुमारास या दोघांचे पार्थिव वैकुंठ स्मशानभूमीत आणण्यात आले. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व खासदार मेधा कुलकर्णी यांनी या दोघांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटूंबियांचे सांत्वन केले.

वैकुंठ स्मशानभूमीत सर्वपक्षीय पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी व मोठ्या पोलीस बंदोबस्तात यावेळी संतोष जगदाळे व कौस्तुभ गणबोटे यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले.

# 'दैव बलवत्तर म्हणून बचावलो'

## रूपाली ठोंबरे हल्ल्याच्या आदल्या दिवशी होत्या पहलगाममध्ये

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

दहशतवादी हल्ला झाला त्या स्पॉटवर आम्ही आदल्या दिवशी होतो, मात्र दैव बलवत्तर म्हणून आम्ही बचावलो असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या आदल्याच दिवशी आम्ही त्याच स्पॉटला होतो. ज्या जंगलामधून हे दहशतवादी आले होते त्या ठिकाणी आम्ही आदल्या दिवशी फोटो काढले होते. प्रत्यक्षात त्यावेळी पाऊस होता. चिखल झाला होता म्हणून आम्ही थोडे लवकर निघालो होतो. त्या दहशतवाद्यांनी कदाचित पावसामुळे आदल्या दिवशी चाल केली नसेल. ते आदल्या दिवशी त्या जंगलातच असले पाहिजेत. त्या दिवशी हल्ला झाला असता तर आमचे काय झाले असते या विचाराने थरकाप होतो. दुसऱ्या दिवशी त्या स्पॉटवरील हल्ल्याची माहिती समजल्यानंतर मनात धस्स झाले. हाच स्पॉट आपण काल पाहत होतो. या दुर्घटनेत मृत झालेल्यांबद्दल तीव्र संवेदना मनात निर्माण झाल्या. सोबतच आपण बचावल्याचे समाधान आणि भीतीदेखील दाटलेली होती. तातडीने महाराष्ट्र गाठून आपल्या घरी सुखरूप पोहोचण्याची धडपड आम्ही सुरू केली होती आणि अखेर सुखरूप घरी पोहोचल्याचे समाधान आहे.

# 'दहशतवाद्यांनी सर्वात आधी शुभमवर गोळी झाडली'

▸▸ कानपूर । वृत्तसंस्था

पहलगाम हल्ल्यात उत्तर प्रदेशच्या कानपूर येथील शुभम द्विवेदी नावाच्या व्यक्तीचाही मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी सर्वात आधी शुभमवर गोळीबार केला आणि मग इतरांवर हल्ला केल्याची माहिती त्याच्या पत्नीने दिली. यावेळी शुभमची पत्नी एशान्याने तिथे नेमके काय घडले सांगितले.

आम्ही तिथे हसत आणि आनंदात बसलो होतो. तो आला आणि धर्माबद्दल विचारू लागला आणि नंतर त्याला गोळी मारली, असे एशान्याने सांगितले. आम्ही तिथे हसत, गप्पागोष्टी करत बसलो होतो. दहशतवादी आले आणि शुभमवर बंदूक रोखत त्याला विचारले की, तू हिंदू आहेस की मुस्लीम? जर तू मुस्लीम आहेस तर कलमा बोलून दाखव. सुरुवातीला आम्हाला काहीच समजले नाही. मग त्यांनी पुन्हा विचारले की, तू हिंदू आहे की मुस्लीम? जेव्हा त्याने हिंदू असल्याचे उत्तर दिले तेव्हा त्यांनी लगेच शुभमवर गोळ्या चालवल्या. दहशतवादी सगळ्यात आधी आमच्याकडे आले. त्यांनी पहिली गोळी शुभमला मारली आणि नंतर लोकांवर गोळीबार सुरू केला, असे एशान्या म्हणाली. दहशतवाद्यांनी एशान्याला मारले नाही. आम्ही काय केले आहे ते सरकारला जाऊन सांग, असे दहशतवाद्यांनी एशान्याला सांगितले.



◉ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी हल्ल्यातील मृत शुभम द्विवेदी यांना कानपूर येथील त्यांच्या निवासस्थानी श्रद्धांजली वाहिली.

# टिकल्या काढल्या, अल्लाह हू अकबर म्हटले तरीही...

## कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नीने सांगितली आपबिती

पुण्याचे कौस्तुभ गणबोटे यांच्या घरी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी भेट दिली. यावेळी कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नी भावूक झाल्या. त्यांनी शरद पवार यांच्यासमोर अंगावर काटा आणणारा पहलगाम हल्ल्याचा अनुभव सांगितला.

कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नी म्हणाल्या की, आम्हाला बऱ्याच लोकांनी मदत केली. सैन्य दलाचीदेखील मदत झाली, पण ती उशिरा झाली. तोपर्यंत हे गेले होते. माझ्यासमोर गोळ्या घातल्या. तुम्ही अजान वाचा म्हणून सांगत होते. आम्ही तिथे असलेल्या सगळ्या महिलांनी मोठ्या-मोठ्याने अजान म्हटले, पण त्यांनी आमच्या माणसांना मारून टाकले. तिथे गेटवर एक मुस्लीम होता, तो म्हणत होता तुम्ही कशाला निरपराध लोकांना मारता.. त्यांनी काय चुकी केली आहे? त्यालासुद्धा पुढे करून गोळ्या घातल्या. आम्ही तिथे घोड्यावर बसून गेलो, तरी आम्हाला भीती वाटत होती. आम्ही पळत सुटलो तिथून तर चिखलात गुडघ्याइतके पाय खाली रुतत होते.

आमचे घोड्यावाले मुस्लीम होते, पण ते खूप चांगले होते. ते आम्हाला हल्ला झाल्यानंतर घ्यायला आले. त्यांचा मित्र बाजूला होता, त्याला बोलावून घेतले आणि म्हणाला 'अजान पढता है क्या, पढता है क्या कुछ?' त्यांचे बोलणे ऐकून आम्ही आमच्या टिकल्या काढून फेकल्या. आम्ही सगळे 'अल्लाह हू अकबर' म्हणायला लागलो, असे कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नीने सांगितले.




देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, कॉंग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले. ● संपादक - * **डॉ. वैशाली बालाजीवाले** ✆ : शहर- २५७५७१६, २५७२४००, फॅक्स - २५७०९३८. ● नाशिकरोड कार्यालय - २९४२२०३, ● मालेगाव कार्यालय फोन व फॅक्स - ०२५५४-२९९२०३, ● सिन्नर फोन व फॅक्स -०२५५१ - २९९२०३, ● दिंडोरी फोन व फॅक्स - ०२५५७-२२२८८८, ● निफाड फोन व फॅक्स - ०२५५७-२९९६९६. (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ● Mail id : newseditnsk@deshdoot.com